प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थ्यांचा शोध घेवून त्यांच्यातील स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी संचनिर्मिती व परिणामकारकता - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

दुगाने गंगाधर भिमराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. बाविस्कर चंद्रकांत राघो

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर-2022

प्रस्तावना :-

स्वमग्न हा एक मनोविकार म्हणून जगभर ओळखला जातो. म्हणून स्वमग्नता ही जन्मस्त आहे. याचा शोध लिओ केनर यानी 1943 मध्ये लावला. व्यक्ती आपल्या विचारात विश्वात रममान असतात. स्वमग्न बाबत सध्याच्या जागतीक परिस्थितीचा आढावा घेतल्यास ASD या आजारासाठी 6/1000 च्या जवळपास इतकी संख्या स्वमग्न विद्यार्थ्यांची आहे. तर पुरुष व महिला अनुपात 3:1 आहे. इ. स. 1980 पासून या मनोविकारात वाढ होत आहे. स्वमग्नता हे विकाराचे एक लक्षण आहे. हे लक्षण देशातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. एका पाहणीनुसार भारत देशात दर हजारामागे सरासरी 7 मुले ही स्वमग्न आढळून येत आहेत.

स्वमग्नतेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्रात नागपूर, नाशिक, पुणे, अहमदनगर, बीड येथे स्वमग्नतेच्या निवारणासाठी ऑटीझम सेंटर उभारण्यात आले आहेत, परंतु सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना ऑटीझम सेंटर मध्ये प्रवेश घेणे हे आर्थिकदृष्ट्या न परवडणारे आहे. स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांचा शोध घेऊन स्थानिक पातळीवर ही स्वमग्नता दूर होण्यासाठी त्याच्या निवारणाची रणनीती आखणे व देशात प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेले स्वमग्न्तेचे प्रमाण कमी करण्याची बाब प्रकर्षाने समोर येत आहे. प्राथमिक शिक्षण हा शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा पाया आहे. प्राथमिक शिक्षणामुळे बालकांचे सक्षमीकरण होते. प्रत्येक बालकांचा स्तर सारखाच असतो असे नाही. त्यामुळे प्रत्येक बालक हा प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी सक्षम असेलच असे नाही, म्हणून अक्षम विद्यार्थ्यांपैकी स्वमग्न असणारे विद्यार्थी यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने व त्यांच्या अंगी असणाऱ्या लक्षणांचा शोध व अभ्यास करण्याच्या हेतूने तसेच त्यांच्या वर्तनप्रकारांमध्ये कोणकोणत्या घटकांचा अंतर्भाव असतो. या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने देशाच्या सर्वच स्तरावर सदरील विषयाची उपयुक्तता महत्वपूर्ण आहे.

स्थानिक पातळीवरील स्वमग्न बाबतचा विचार करता महाराष्ट्रातील व नांदेड जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये थोड्या बहुत प्रमाणात

स्वमग्नतेची लक्षणे दिसून येतात, परंतु शाळेत शिक्षक या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे विदारक चित्र ग्रामीण भागासह शहरी भागातही मोठ्या प्रमाणात दिसून येते. यासाठी अशा स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांचा शोध घेऊन विद्यार्थी व शिक्षकांची मानसिकता व त्यांच्यातील स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी सातत्य पूर्ण सर्वंकष प्रयत्न करणे अपरिहार्य आहे.

यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेणे भावी पिढीच्या हितासाठी उपयुक्त ठरते. महाराष्ट्रात पर्यायाने महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये स्वमग्न विद्यार्थ्यांच्या वर्तन प्रकाराबाबत जाणून घेऊन त्याच्या भावी शैक्षणिक यशस्वी वाटचालीसाठी प्रस्तुत संशोधनाची उपयुक्तता महत्वपूर्ण ठरते. आजचा प्रत्येक विद्यार्थी देशाचा उद्याचा सुजाण नागरिक म्हणून त्याच्याकडे पाहत असतांना तो स्वमग्नतेच्या मनोविकाराने ग्रासलेला असेल आणि त्याला व पर्यायाने शिक्षकांना याची जाणीव नसेल, तर भविष्यात फार मोठी हानी पोहचू शकते, म्हणून यासाठी सदर संशोधनाची उपयुक्तता महत्त्वपूर्ण ठरते.

संशोधनाची गरज :-

एकूण सामान्य लोकांमध्ये दिव्यांगत्व जवळपास 10% लोकांमध्ये दिव्यांगत्व असते, परंतु त्याचा स्वीकार करायची त्यांची मानसिकता नसते. किंवा त्यांना याबद्दल माहितीच नसते. स्वमग्नेतेसंदर्भातही असाच काहीसा प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे सर्वप्रथम शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण शोधणे आवश्यक असून नांदेड जिल्ह्यातील शाळांमधील एकूण स्वमग्न विद्यार्थ्यांचे प्रमाण शोधून स्वमग्न विद्यार्थ्यांच्या प्रकारातील बालकांची संख्या माहित करून घेणे तेवढेच अपरिहार्य आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमधील स्वमग्न च्या प्रकारानुसार उपचारात्मक कृती कार्यक्रम तयार करण्याचीही तेवढीच आवश्यकता आहे. तयार करण्यात येणारा कृती कार्यक्रम कितपत

परिणामकारक आहे. विविध निकषांच्या आधारे त्यात अधिक परिणामकारकतेसाठी बदल करणे आवश्यक आहे. वरील या सर्व बाबींसाठी प्रस्तुत संशोधन हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे. स्वमग्न विद्यार्थी ओळखणे हे कठीण असून अशा विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी चाचणी तयार करणे गरजेचे आहे.

संशोधनाचे महत्व :-

स्वमग्न विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या संचाचा स्वमग्न विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यास मदत होईल. स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांचा शोध घेऊन परिणामकारक उपचारपद्धती निश्चित करून स्वमग्न विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यास प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल. या संशोधनामध्ये प्रयोगाच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यासाठी उपयुक्त ठरेल. आवश्यक शिफारसी सुचविण्यासाठी हे संशोधन महत्वपूर्ण ठरेल. या संशोधनांती स्वमग्न लक्षणांच्या निवारणासाठी संचाची निर्मिती करण्यात येईल. व त्याच्या आधारावर त्या संचाचे सामान्य वापरासाठी उपयोजन करता येणे शक्य होईल.

समस्या विधान :-

प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्यातील स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी संचनिर्मिती व त्याची परिणामकारकता - एक अभ्यास

कार्यात्मक व्याख्या :-

1) **प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी :-** नांदेड जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील विद्यार्थी म्हणजे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी होय.

2) **स्वमग्न विद्यार्थी :-** नांदेड जिल्हयातील मराठी माध्यमातील प्राथमिक शाळेतील असे विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये एक किंवा अधिक अक्षमता आहे. अशी बालके म्हणजे स्वमग्न विद्यार्थी होय.

3) **स्वमग्नतेची लक्षणे :-**

I. डोळ्यात डोळे घालून बोलण्यास घाबरतात.
II. एकच कृती पुन्हा पुन्हा करतात व तेच तेच शब्द पुन्हा उच्चारतात.
III. वयाची तीन वर्ष पूर्ण होऊनही अशी मुले अर्थपूर्ण शब्द बोलू शकत नाहीत.
IV. अजिबात न बोलणे वारंवार सूचना द्याव्या लागणे.
V. जी बालके हाकेला प्रतिसाद देत नाहीत व आपले बोलणे ऐकूनही न ऐकल्यासारखे करतात.
VI. संवादात अडथळे असणे व एकटे राहण्यास आवडणे. लहान मुलांमध्ये मिसळून न खेळणे. व ज्या विद्यार्थ्यांचा सामान्य विद्यार्थ्यांच्या तुलनेत विकास मंद असतो.

4) **संचनिर्मिती :-** स्वमग्नतेच्या लक्षणावर आधारित उपचारात्मक कृती कार्यक्रमाची एकत्रित मार्गदर्शिका तयार करणे म्हणजे संचनिर्मिती होय.

5) **परिणामकारकता :-** नांदेड जिल्हयातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांवर प्रयोग करून कृती कार्यक्रमाची सिद्धता म्हणजे परिणामकारकता होय.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1) नांदेड जिल्हयातील प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

2) प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या स्वमग्नतेच्या लक्षण व वर्तन प्रकारांचा त्यांच्या अध्ययन प्रक्रीये संदर्भात अभ्यास करणे.

3) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्वमग्नतेच्या लक्षणावर आधारित संच निर्मिती करणे.

4) प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या वर्तनावर झालेला परिणाम अभ्यासने.

5) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

1) स्वमग्न मुलांच्या समोर येणाऱ्या आव्हानांचे महत्व जगाने ओळखले पाहिजे. **(निक होज, 2018)**

2) स्वमग्न विद्यार्थ्यांची विचारप्रक्रिया सामान्य व्यक्तीपेक्षा पूर्णपणे भिन्न असत नाही काही परिस्तिथीमध्ये त्यांच्यातील फरक फायदेशीर ठरतो हे ही सिद्ध झाले आहे. **(रूट बायर्न व किन्गा मोस्सान्यी, 2019)**

3) स्वमग्नतेच्या लक्षणांवर मात करण्यासाठी उपचार पद्धती फायदेशीर ठरू शकते. उपचारांती असा रुग्ण पूर्ण पणे बरा होण्यास मदत होते हे सिद्ध झाले आहे. **(कादंबरी नानिवाडेकर, 2015)**

संशोधन परिकल्पना :-

1) नांदेड जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांमधील स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी तयार करण्यात येणारी संचनिर्मिती विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरते.

2) नांदेड जिल्हयातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांमधील स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी तयार करण्यात आलेल्या संच निर्मितीचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर प्रभाव पडतो.

शुन्य परिकल्पना :-

i. नांदेड जिल्हयातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांमधील पूर्व चाचणीच्या स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षण निवारणात सार्थ फरक नाही.

ii. नांदेड जिल्हयातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक व नियंत्रित गटातील उत्तर चाचणीच्या स्वमग्न विद्यार्थ्यांच्या बदलात सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

i) आशय व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्हयातील प्राथमिक स्तरावरील स्वमग्न विद्यार्थी व त्यांच्या लक्षणांचा शोध घेणे एवढ्या पुरता व्यापक आहे.

ii) क्षेत्र व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयातील प्राथमिक शाळांपुरतेच व्यापक आहे. नांदेड जिल्हयातील शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागातील,

ज्या मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळा आहेत एवढीच क्षेत्र व्याप्ती आहे.

iii) घटक व्याप्ती :-

प्रस्तुत संकल्पित संशोधन नांदेड जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळांमधील स्वमग्न विद्यार्थी या घटकापुरतेच व्यापक आहे.

iv) काल व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन फेब्रुवारी २०२२ ते मार्च २०२५ या तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा :-

i. **आशय मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या स्वमग्नतेच्या लक्षणांचा शोध घेणे एवढ्या पुरतेच मर्यादित आहे.

ii. **क्षेत्र मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील मराठी माध्यमांच्या शाळांपुरतेच याचे क्षेत्र मर्यादित आहे.

iii. **घटक मर्यादा :-** संकल्पित संशोधन नांदेड जिल्ह्यातील स्वमग्न विद्यार्थी व त्यांच्या स्वमग्नतेच्या लक्षणांच्या निवारणासाठी संच निर्मिती करून त्याची परिणामकारकता अभ्यासने या घटका पुरतेच मर्यादित आहे.

iv. **काल मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन फेब्रुवारी 2022 ते फेब्रुवारी 2025 या तीन वर्षाच्या कालावधीत संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

परिमर्यादा :-

1) प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांचा शोध घेऊन स्वमग्नतेच्या लक्षणांच्या आधारावर संचनिर्मिती करण्यात येईल.

2) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील मराठी माध्यमांच्या अनुदानित, विनाअनुदानित व जिल्हापरिषदेच्या शाळांचा समावेश करण्यात येईल.

संशोधनाची पद्धती :-

प्रस्तुत संशोधनात संख्यात्मक व गुणात्मक प्रकारची माहिती संकलित केली जाणार असल्यामुळे मिश्र संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. स्वमग्न विद्यार्थ्यांच्या स्वमग्नतेच्या लक्षणांचा व वर्तन प्रकारांचा अभ्यास करण्यासाठी सदरील संशोधन पद्धती निवडली आहे.

जनसंख्या :-

नांदेड जिल्ह्यामध्ये अनुदानित व विना अनुदानित तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा एकूण 3397 इतक्या प्राथमिक शाळा आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी ही जनसंख्या असेल.

नमुना व नमुना निवड पद्धती :-

नांदेड जिल्ह्यातील अनुदानित व विना अनुदानित तसेच जिल्हा परिषदेच्या अंदाजे 400 शाळांमधून स्वमग्न विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात येईल. व त्यावर आधारित स्वमग्न लक्षणांच्या आधारावर वारंवारिता

निश्चित करण्यात येईल. तसेच स्वमग्न लक्षणांच्या वारंवारीतेनुसार व उपलब्ध वारंवारीतेनुसार प्रायोगिक संशोधन पद्धतीसाठी सहेतुक नमुना निवडीद्वारे नमुना निवड करण्यात येईल.

संशोधनाची साधने व तंत्रे :-

प्रस्तुत संशोधानासाठी संशोधक माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनांचा वापर करेल.

1) स्वमग्नता शोधीका (संशोधक निर्मित)
2) पडताळा सूची (संशोधक निर्मित)
3) स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांच्या निवारणासाठी संचनिर्मिती (संशोधक निर्मित)
4) पूर्वचाचणी उत्तर चाचणी व विद्यार्थ्यांचे गुणपत्रिका

संख्याशास्त्रीय परिमाणे :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन t- परिक्षीका, या संख्याशास्त्रीय साधनांचा माहिती विश्लेषणासाठी उपयोग करेल.

संशोधनाची कार्यवाही :-

1) प्रथम संबधित साहित्यांचा आढावा व मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली समस्या निश्चित करण्यात येईल.

2) समस्या व उद्दिष्टांनुरूप नमुना कार्यपद्धती व प्रायोगिक अभिकल्प निश्चित करण्यात येईल.

3) संशोधन निर्मितीसाठी विद्यार्थ्यांसाठी शोधिका तयार करून स्वमग्नतेची लक्षण असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात येईल. विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार करण्यात येईल.

4) माहिती संकलन साधनांचे चाचणी प्रमानिकरणाच्या टप्प्याद्वारे प्रमाणीकरण करण्यात येईल.

5) नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील स्वमग्न विद्यार्थ्यांच्या लक्षणांचे निश्चितीकरण करण्यात येईल.

6) प्रायोगिक कार्यवाही व माहितीचे संकलन केले जाईल.

7) विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात येईल.

8) संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

9) मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लिहून तपासून चुकांची दुरुस्ती केली जाईल.

10) प्रबंधाची बांधणी करून प्रबंधावर मार्गदर्शकांची स्वाक्षरी घेऊन प्रबंधाच्या पाच प्रती विद्यापीठात सादर करण्यात येतील.

प्रकरणीकरण :-

1) प्रस्तावना

2) संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा

3) संशोधनाची कार्यपद्धती

4) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

5) निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठीचे विषय

वेळापत्रक :-

अ.क्र	संशोधन कालावधी	नियोजित कार्य
1	फेब्रुवारी 2022 ते एप्रिल 2022	पूर्व साहित्यांचे वाचन
2	मे 2022 ते जुलै 2022	पूर्व साहित्यांचे वाचन
3	ऑगस्ट 2022 ते ऑक्टोंबर 2022	पूर्व साहित्यांचे वाचन, कोर्स वर्क परीक्षा
4	नोव्हेंबर 2022 ते फेब्रुवारी 2023	पूर्व साहित्यांचे वाचन, संशोधन पेपर वाचन चर्चा सत्र सहभाग व तयारी
5	मार्च 2023 ते में 2023	संशोधन पेपर वाचन, चर्चा सत्र सहभाग व तयारी, प्रश्नावली निर्मिती
6	जून 2023 ते ऑगस्ट 2023	संशोधन पेपर वाचन, चर्चा सत्र सहभाग व तयारी, प्रश्नावली निर्मिती, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
7	सप्टेंबर 2024 ते नोव्हेंबर 2024	चर्चा सत्र सहभाग व तयारी, क्षेत्र अभ्यास माहिती संकलन
8	डिसेंबर 2024 ते फेब्रुवारी 2024	चर्चा सत्र, शोध घेणे, तयारी करणे, माहिती संकलन
9	मार्च 2024 ते में 2024	चर्चा सत्र, शोध घेणे, तयारी करणे, माहिती संकलन
10	जून 2024 ते ऑगस्ट 2024	संशोधन पेपर प्रकाशित करणे, संकलित माहितीचे विश्लेषण
11	सप्टेंबर 2024 ते नोव्हेंबर 2024	संशोधन प्रबंध लेखन, सारांश लेखन

12	डिसेंबर 2024 ते फेब्रुवारी 2025	प्रबंध सादरीकरन व पूर्व मुलाखतीची तयारी

अंदाजपत्रक :-

अ.क्र.	**विवरण**	**खर्च(रुपये)**
1	नोंदणी शुल्क	600
2	संशोधन विषयांशी संबधित संशोधन आढावा	5000
3	इंटरनेटचा वापर	5000
4	झेरॉक्स	5,000
5	पेन ड्राईव	1500
6	प्रिंट काढणे	1000
7	कलर प्रिंट काढणे	1500
8	संशोधन पेपर प्रकाशन	10,000
9	परीसंवाद कार्यशाळा सहभाग	5,000
10	टायपिंग फी	5,000
11	प्री व्हायवा	2,000
12	प्रबंध टायपिंग, बायडिंग , इम्बोसिंग	10,000
13	अचानकपणे येणारा खर्च अंदाजे	10,000
14	प्रवास खर्च	15,000
15	प्रबंध विद्यापीठास आठ प्रतीत सादर करणे	5,000
	एकून खर्च	**81,600**

संदर्भग्रंथ सूची :-

Aldred, Green, J., & Adams, C. (2004). A new social communication intervention for children with autism: pilot randomised controlled treatment study suggesting effectiveness. *Journal of Child Psychology and Psychiatry*, 45, 1420–1430.

American Psychiatric Association. (2000). *Diagnostic and statistical manual of mental disorders* (4th ed., text revision). Washington, D C: American Psychiatric Association.

Anderson, A., Moore, D. W., Godfrey, R., & Fletcher-Flinn, C. M. (2004). Social skills assessment of children with autism in free-play situations. *Autism*, Baron-Cohen, S., Leslie, A.M., & Frith, U. (1985). Does the autistic child have a "theory of mind"? *Cognition,* 21, 37-46.

Barry, L. M., & Burlew, S.B. (2004). Using social stories to teach choice and play skills to children with autism. *Focus on Autism and Other Developmental Disabilities*, 19, 45-51.

Bates, E., Benigni, L., Bretherton, I., Camaioni, L., & Volterra, V. (1979).*The Emergence of Symbols: Cognition and Communication in Infancy*.New York: Academic.

Bauminger, N. (2002). The Facilitation of Social-Emotional Understanding and Social Interaction in High-Functioning Children with Autism: Intervention Outcomes. *Journal of Autism and Developmental Disorders*, 32, 283-298.

Bauminger, N., & Kasari, C. (2000). Loneliness and friendship in high-functioning children with autism. *Child Development*, 71, 447-456.

Bauminger, N., Shulman, C., & Agam, G. (2003). Peer Interaction and Loneliness in High-Functioning Children with Autism. *Journal of Autism and Developmental Disorders*, 33, 489-507.

Carpenter, M., Nagell, K., & Tomasello, M. (1998). Social cognition, joint attention, and communicative competence from 9 to 15 months of age. *Monograph of Social Research and Child Development,* 63, 1-143.

Castelli, F., Frith, C., Happe, F., & Frith, U. (2002). Autism, Asperger syndrome and brain mechanisms for the attribution of mental states to animated shapes. *Brain,* 125, 1839-49.

Delprato, D. (2001). Comparison of discrete trial and normalized behavioural language intervention for young children with autism. *Journal of Autism and Developmental Disorders*, 31, 315-325.

Dennis, M., Lockyer, A.L., & Lockyer, L. (2001). Inferential Language in High-Function Children with Autism. *Journal of Autism and Developmental Disorders,* 31, 47-54.

Eikeseth, S., Smith, T., & Smith, E. (2002). Intensive Behavioral Treatment at School for 4-to 7-Year-Old Children with Autism A 1-Year Comparison Controlled Study. *Behavior Modification*, 26, 49-68.

पंकजम श्रीदेवी., (२०१६). ***अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम,*** **Retrieved from http://www.divyangunnatizpkolhapur.com/Images/RPWD-Act-2016-MARATHI_accessible.pdf**

फुले, ग. न. (२०१३). ***अध्ययन अक्षमता***, (प्रथम आवृत्ती), अमरावती : गंध प्रकाशन.

सुधीर देवराय भोपे., (१९९५). ***अपंग कायदा***, समान संधी, हक्क, संरक्षण व पूर्ण सहयोग.

प्रा. डॉ. बाविस्कर चंद्रकांत राघो
मार्गदर्शक

दुगाने गंगाधर भिमराव
संशोधक